म. रा. [illegible]
आवक क्र. U539
दिनांक 21 SEP 1999
कार्यासन क्र. १(२)...

२१/९ [illegible]

आदिवासी मुला-मुलींचे शासकीय [illegible]
विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या [illegible]
आणणेबाबत.

क्रीडा 'साहित्य' [illegible]

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक-आवगृ-१२९९/प्र.क्र.५९(९९)कार्या-१२

मंत्रालय, विस्तार मुंबई - ४०० ०३२.

दिनांक - १७ सप्टेंबर, १९९९.

वाचा- १) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग,क्रमांक- बीसीएच-१३८४/३६३२७/ कार्या-१२.दि.११.७.१९८५.
२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग,क्रमांक-आवगृ-१२९८/प्र.क्र.३९(९८)कार्या-१२,दि.२७.८.१९९९.
३) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे अर्ध शासकीय पत्र क्रमांक-वगृ-१४९७/प्र.क्र. ६/कार्या-१(२).
दिनांक- १५ जानेवारी, १९९८.

<u>शासन निर्णय</u> - या विभागामार्फत शासकीय वसतिगृह ही योजना राबविण्यात येत असून या योजनेअंतर्गत [illegible] स्थिती १८८ वसतिगृहे सुरु आहेत. त्यापैकी १२४ वसतिगृह मुलांचे व ६४ वसतिगृह मुलींची आहेत. [illegible] दिनांक ११ जूलै, १९८५च्या शासन निर्णयातील परिशिष्ट 'ब' मध्ये (ई) क्रीडा व्यवस्था या [illegible] वसतिगृहास शक्यतो स्वताचे क्रीडांगण असावे, असल्यास क्रीडा साहित्य खरेदी करण्यासाठी दरवर्षी [illegible] खर्च करण्याची मर्यादा ठरवून दिलेली आहे. परंतु ही मर्यादा १५ वर्षा पूर्वीची आहे. [illegible] किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याने सध्या उपलब्ध करुन देण्यात येणारी तरतूद [illegible] शासकीय वसतिगृहातील मुला -मुलींच्या सुप्त गुणांना वाव मिळून त्यांचा सर्वांगिण विकास घडविणे आवश्यक [illegible] [illegible] दृष्टिकोनातून क्रीडा साहित्याच्या रकमेत वाढ करणे क्रमप्राप्त आहे.

२. शासकीय वसतिगृहातील मुला-मुलींच्या शारिरिक दृष्टया वाढ चांगली व्हावी, तसेच त्यांना खेळाचे प्रोत्साहन मिळण्यासाठी सन १९९९ -२००० या शैक्षणिक वर्षापासून शासनाचे दिनांक ११ जूलै,१९८५ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट 'ब' मध्ये क्रीडा साहित्य खरेदीसाठी ठरवून दिलेल्या रकमेत रु. २००/- ऐवजी रु.१,०००/- [illegible] करण्यास शासन मंजूरी देत आहे.

३. यावरील होणारा खर्च हा मागणी क्रमांक- "टी-१ ,२२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण -२७७,शिक्षण-०१-अनुसूचित जमातीतील मुले-मुली यांच्या करीता शासकीय वसतिगृहे सुरु करणे व त्यांचे परिरक्षण करणे (२२२५ १०७२)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून तो [illegible] भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु.सा. [illegible])
कार्यासन अधिकारी

प्रती,
आयुक्त, आदिवासी विकास नाशिक (५ प्रती),

अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे/ नासिक/ नागपूर/ अमरावती.
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास मंहामंडळ मर्यादित,नाशिक
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, १/२, मुंबई/नागपूर.(लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, १/२ मुंबई/नागपुर (लेखापरिक्षा)
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय, मुंबई-३२
निवड नस्ती -कार्यासन-१२.